## ✣ ८४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ✣

सन्माननीय सहकारी सभासद बंधु भगिनींनो,

वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लिमिटेड, देवतळे या संस्थेची ८४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार, दि. १२ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ९.३० वाजता** देवतळे येथे संस्थेच्या सभागृहात बोलाविण्यात आली आहे. सभेत खालील विषयांवर विचार विनिमय होईल. तरी सभासदांनी सभेस नियोजित वेळी उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

### ✣ सभेपुढील विषय ✣

१) दुःखवट्याचे ठराव करणे.
२) मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
३) सन २०२२-२०२३ सालचा कार्यकारी मंडळाने सादर केलेला अहवाल, व्यापारी पत्रक, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक मंजूर करणे.
४) संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२२-२०२३ सालच्या नफा-वाटणीस मंजुरी देणे.
५) सन २०१८-१९ सालची सभासदांनी न नेलेली डिव्हीडंड रक्कम रु. ४,५९०.०० रिझर्व्ह फंड खाती वर्ग करण्यांत आली आहे त्यांस मंजुरी देणे.
६) सन २०२३-२०२४ सालासाठी बाहेरील कर्जाची मर्यादा ठरविणे.
७) सन २०२३-२०२४ सालासाठी सभासदांचे नॉर्मल क्रेडीट ठरविणे.
८) सन २०२३-२०२४ सालासाठी शासकीय लेखा परिक्षक नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
९) सन २०२४-२०२५ वर्षासाठी अंतर्गत हिशोब तपासणीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
१०) सन २०२२-२०२३ या वर्षाच्या शासकीय लेखा परिक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
११) सन २०२३-२०२४ या वर्षाच्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
१२) ८४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांची रजा मंजूर करणे.
१३) केंद्र शासनाने पुरस्कृत केलेले प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचे आदर्श उपविधी स्वीकारणेबाबत विचार करणे.
१४) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

देवतळे - वसई
दिनांक : १८-७-२०२३

आपला विश्वासू,
**हरेश्वर नारायण राऊत**
मानद् सचिव

**टीप :** १) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या पोटनियम क्र. २४(१) प्रमाणे वरील ठिकाणी एक तासानंतर त्याच विषयावर घेण्यात येईल. तहकुबीनंतरच्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. (२) अहवालात नमूद केलेल्या जमाखर्च व ताळेबंद वगैरे विषयाची माहिती ज्या सभासदांस पाहिजे असेल त्यांना दिनांक २९-७-२०२३ पर्यंत कार्यालयात मिळू शकेल. काही प्रश्न विचारावयाचे असल्यास सदरहू प्रश्न दिनांक १-८-२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळात लेखी पाठवावेत. वेळेवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे योग्य त्या तपशीला अभावी देता येणे शक्य होईलच असे नाही. (३) शासकीय लेखा परीक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवाल संस्थेच्या दप्तरी पहावयास उपलब्ध आहे. (४) सभेस येताना अहवाल सोबत आणावा. (५) वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजेरीसाठी अर्ज कार्यालयात उपलब्ध आहे.

**सभेस येताना ओळखपत्र दाखविणे जरूरीचे आहे.**





## ✣ अहवाल वर्ष ८४ वे ✣

### १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३

सन्माननीय सहकारी सभासद बंधु भगिनींनो,

आपल्या संस्थेच्या ८४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमंत्रणास मान देवून आपण उपस्थित राहिला, याबद्दल मला व व्यवस्थापक मंडळास आनंद होत आहे. मी उपस्थितांचे व्यवस्थापक मंडळाच्या वतीने हार्दिक स्वागत करतो. संस्थेचा १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ अखेरचा ८४ वा वार्षिक अहवाल, त्या सोबत त्याच कालावधीचा अंतर्गत हिशोब तपासनीसांनी प्रमाणित केलेला ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, व्यापारी पत्रक व्यवस्थापक मंडळाच्या वतीने आपणांस सादर करतो. आपण त्यास मंजूरी द्यावी ही विनंती.

### भाग भांडवल :

अहवाल वर्षी संस्थेचे एकूण भांडवल रु. ४,७३,१००/- इतके झाले आहे. अहवाल साली सभासद संख्या १००२ आहे.

### ठेवी :

वर्ष अखेरीस संस्थेकडे रु. २५,६१,७०७/- मुदत ठेवी आहेत. संस्थेच्या सभासदांनी, हितचिंतकांनी संस्थेवरील विश्वास, आस्था व सहकार्याच्या भावनेने आपल्या ठेवी संस्थेकडे गुंतविल्याबद्दल ठेवीदारांचे मनःपूर्वक आभार मानतो. अहवालवर्षी संस्थेकडे रु. ३९,३४७/- च्या बचत ठेवी जमा आहेत.

### रिझर्व्ह फंड व इतर फंड :

अहवाल वर्षारंभी वरील फंडाची रक्कम रु. ९,६७,५७,५२५/- होती. त्यात वाढ होऊन वर्ष अखेरीस रु. ९,९३,०९,२०१/- एवढी झाली. या फंडाची झालेली वाढ संस्थेच्या स्थैर्यात व विश्वासात भर घालणारी आहे.

### गुंतवणूक :

अहवाल वर्षारंभी रु. ९,०२,९४,९७२/- ची गुंतवणूक होती. त्यात अहवाल वर्षी वाढ होऊन वर्षअखेर रु. ९,३१,२१,८५७/- एवढी गुंतवणूक झाली आहे.

### व्यवस्थापक मंडळ :

अहवाल सालात व्यवस्थापक मंडळाच्या १३ सभा झाल्या. त्यात मासिक सभा, तातडीची सभा व विशेष सभेचा अंतर्भाव आहे. उपसमितीच्या ८ सभा झाल्या. या सर्व सभांना कार्यकारी मंडळाचे सदस्य नियमितपणे उपस्थित राहिले. संस्थेच्या प्रगतीत त्यांनी उपयुक्त सहभाग व सहकार्य केले. गणसंख्येच्या अभावी एकही सभा तहकूब करावी लागली नाही.

### सभासद कर्जे :

अहवाल वर्षारंभी सभासदांकडून रु. १,३२,८३५.०० कर्जे येणी होती. वर्ष अखेरीस एकूण रु. १,१८,५००.००

कर्ज रक्कम सभासदांकडून येणे बाकी राहिली आहे. कार्यकारी मंडळाने शेती पूरक कर्ज वाटप चालू केले आहे. त्याचा सर्व सभासदांनी लाभ घ्यावा.

## ऑडीट ( लेखा परिक्षण ) :

संस्थेचे सन २०२२-२०२३ सालचे शासकीय लेखा परिक्षण मा. संदिप बी. जैन अँड असोसिएट, चार्टर्ड अकौंटंट यांनी केले असून लेखा परिक्षण अहवाल मिळालेला आहे. संस्थेस या वर्षी "अ" वर्ग देण्यांत आला आहे. त्याचा अहवाल सोबत जोडला आहे.

सन २०२२-२०२३ सालचे अंतर्गत लेखा परिक्षण संस्थेने नेमलेले मे. मनिष शिंदे अँड असोसिएट, चार्टर्ड अकौंटंट, वसई ह्यांनी पूर्ण केले असून त्यांचा अहवाल सोबत जोडला आहे.

## विक्री केंद्र :

संस्था देवतलाव, होळी बाजार, किरवली, मुळगांव व उंबरगोठण येथे शेती वस्तूंचे पाच डेपो व होळीबाजार, किरवली, उमेळे व वासळई येथे किराणा मालाची चार दुकाने चालवित आहे. देवतलाव येथे शेती बागायती व जीवनोपयोगी वस्तुंशिवाय लोखंड, पाईप, लोखंडी पत्रे, सिमेंट, सिमेंट पत्रे, व्हाईट सिमेंट, सिमेंट ब्लॉक्स, नेरोलॅक पेंट, निलकमल प्लास्टीक खुर्च्या / टेबले व इतर उत्पादने तसेच पतंजलीची उत्पादने, पी.व्ही.सी. पाईप, पाईप फिटींगचे सामान, ठिबक सिंचन पद्धत व तुषार संचाचे सामान, भारत गॅस विक्री, गॅस करिता लागणाऱ्या सुरक्षा ट्युब व उपकरणे, मिश्रणखत विक्री केंद्र, भारत पेट्रोलियम कंपनीचे वंगणतेल व सिन्टेक्स पाण्याच्या टाक्यांची विक्री चालवित आहोत. संस्थेची देवतलाव, माणिकपूर येथे भारत गॅस विक्री केंद्रे आहेत.

व्यवस्थापनाने देवतलाव येथे ड्रायफ्रुटस् मार्ट चालू करून ड्रायफ्रुटस्, कुकीज व चिक्कीची किरकोळ विक्री अमूल व चितळे या नामांकित कंपनीची उत्पादने विक्रीस ठेवलेली आहेत. तसेच हॅवमोर आईस्क्रिम, बिसलरी पाण्याची उत्पादने विक्रीस ठेवलेली आहेत. दुकानात 'ऑरा ऑरगॅनिक्स' या नामांकित कंपनीची लाकडी घाणावर तयार केलेली शुद्ध नैसर्गिक खाद्यतेलाची उत्पादने विक्रीस ठेवलेली आहेत.

संस्थेने सामान्य माल, किराणा माल, भारत गॅस माल व मिश्रण खत माल या विभागांत अहवाल वर्षी रु. ७३,०३,६९,६७३/- ची खरेदी केली आहे. तसेच रु. ७७,७४,७६,२४०/- ची विक्री केलेली आहे. अहवाल वर्षी संस्थेस व्यापारी नफा रु. १,७५,६७,९६९/- झालेला आहे व निव्वळ नफा रु. ४०,५९,२७६/- झालेला आहे.

अहवाल वर्षी संस्थेने सभासद व ग्राहक यांना दि. १० ऑक्टोबर २०२२ ते दि. ३१ डिसेंबर २०२२ या सणासुदीच्या कालावधीमध्ये व्यवस्थापनाने किराणामाल माल खरेदीवर ग्राहकांना २% प्रमाणे सूट देण्याचे प्रस्तावित केले होते. सभासदांनी व ग्राहकांनी या संधीचा फायदा घेतला. अहवाल वर्षी संस्थेने सभासदांना गतवर्षीप्रमाणे या वर्षीदेखील दि. १० ऑक्टोबर २०२२ ते दि. १२ नोव्हेंबर २०२२ या कालावधीसाठी सभासदांना ८ किलो साखर प्रति किलो रु. ३३/- या सवलतीच्या दराने दिली होती.





## सेवक वर्ग :

संस्थेस लाभलेल्या कार्यक्षम सेवकवर्गाने दिलेल्या उत्तम सहकार्यामुळे संस्थेला आजची प्रगती करणे साध्य झाले आहे व यापुढेही त्यांचे असेच सहकार्य लाभत राहील अशी आशा बाळगतो. संस्थेचे एकूण ६७ कर्मचारी आहेत. त्याचा खातेप्रमाणे तपशील येणे प्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| कार्यालयीन कर्मचारी | : | ०७ |
| जनरल शॉप कर्मचारी | : | २४ |
| भारत गॅस कर्मचारी | : | १३ |
| चालक | : | ०६ |
| लॉरीवरील हमाल | : | १३ |
| हातगाडीवरील हमाल | : | ०४ |
| **एकूण** | : | ६७ |

सर्व कर्मचारीवृंदासाठी अहवाल वर्षी पगार, सानुग्रह अनुदान म्हणून रु. १,८१,९०,६५३/- खर्च करण्यात आले आहेत. ट्रायसिकल कामगार यांना इन्सेन्टीव्ह म्हणून रक्कम रुपये २,५८,००८/- दिलेली आहे. या सर्व खर्चास आपण मंजूरी द्यावी ही विनंती. अहवाल वर्ष अखेर कर्मचारीवृंदाकडून रु. २,१७,८०३/- कर्ज येणे बाकी आहे.

## आरोग्य शिबिर :

आपल्या संस्थेने व वोक्हार्ट लाईफ विन्स मिरारोड यांच्या संयुक्त विद्यमाने सभासद व त्यांच्या कुटुंबियांसाठी सुपर स्पेशालिटी आरोग्य शिबिर शुक्रवार दि. १८ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. शिबिरासाठी डॉ. अनुप ताकसांडे (MBBS, MDDM, Cardiology) व डॉ. पवन पै (इंटरव्हेंशनल न्यूरोलॉजिस्ट आणि स्ट्रोक विशेषज्ञ) आणि त्यांचे सहकारी उपस्थित राहून आरोग्य तपासणी, वजन मापन Randomly रक्तातील साखर तपासणी, रक्तदाब BMD, ECG तपासणी केली व मार्गदर्शन केले.

## शेती व्याख्यान व धर्मदाय फंडाचे वाटप :

आपल्या संस्थेतर्फे शेतकऱ्यांना मार्गदर्शन देण्यासाठी संस्था निरनिराळे उपक्रम करीत असते. या मार्गदर्शनातून शेतकऱ्यांनी प्रेरणा घ्यावी व आपल्या शेती व्यवसायात प्रगती करावी ही अपेक्षा असते. याचदृष्टीने शेतकऱ्यांसाठी 'सेंद्रीय शेती काळाची गरज' ह्या विषयावर मार्गदर्शन व धर्मदाय फंडाचे वाटप शनिवार दि. १० डिसेंबर २०२२ रोजी दुपारी ४.३० वाजता संस्थेच्या सभागृहात ओजित केले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. राजेंद्र श्रीकृष्ण भट (राज्य सरकारचा विभागीय सेंद्रीय कृषी भुषण पुरस्कार प्राप्त) यांनी सभासदांना मार्गदर्शन केले.

तसेच धर्मदाय फंडामधून पुढील संस्थाना धनादेशाचे वाटप करण्यात आले :

१) जयहिंद वाचनालय रु. १५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र)

२) श्रीहरी मंदिर, माकुणसार रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र)

३) बॅसीन एज्युकेशन सोसायटी, वसई रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र)

४) सोमवंश क्षत्रिय समाज महामंडळ, वसई रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र)

## कृषी पर्यटन भेट :

अहवाल वर्षी संस्थेने सभासदांसाठी वाडा (कृषी भुषण श्री. अनिल पाटील ह्यांचे सांगेवाडी येथील कृषी पर्यटन केंद्र) येथे बुधवार दि. ८ फेब्रुवारी २०२३ व शुक्रवार दि. १० फेब्रुवारी २०२३ रोजी शैक्षणिक कृषी पर्यटन भेट आयोजित केली होती. संस्थेच्या एकूण २२५ सभासदांनी कृषी पर्यटन केंद्राला भेट दिली. कृषी भुषण श्री. अनिल पाटील यांनी सभासदांना आधुनिक शेतीविषयक मार्गदर्शन केले.

## संस्थेचा ८३ वा वर्धापन दिन :

आपल्या संस्थेचा ८३ व्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार दि. २२ एप्रिल २०२३ रोजी संस्थेची सभागृहात श्री सत्यनारायणाची पुजा आयोजित करण्यात आली होती. संस्थेचे सभासद, कर्मचारी या सर्वांनी संध्याकाळी ४ ते ७ पर्यंत उपस्थित राहून तिर्थप्रसादाचा लाभ घेतला.

## बिल्डिंग दुरूस्ती :

निर्मळ येथील गोडाऊन सभोवताली कॉंक्रिटीकरण व इतर कामासाठी एकूण रुपये १९,१३,७८३/- खर्च झालेला आहे.

## सभासद कल्याण निधी :

अहवाल वर्षी ४६ सभासदांना रु. ४,५०,७००/- त्यांच्या विनंतीवरून गंभीर आजारात सभासद कल्याण निधीतून आर्थिक मदत केली आहे.

## कर्मचारी कल्याण निधी :

अहवाल वर्षी संस्थेने ६ कर्मचाऱ्यांना रु. ३८,६००/- त्यांच्या विनंती वरून गंभीर आजारात कर्मचारी कल्याण निधीतून आर्थिक मदत केली आहे.

## सभासदांनी खालील सूचनांची नोंद घ्यावी :

१) **नवीन भाग दाखले तयार असून सभासदांनी आपले भाग दाखले संस्थेच्या मुख्य कार्यालयातून दुपारी ३ ते ५ ह्या वेळेत घेऊन जावेत.**

२) सभासदांनी आपल्या डिव्हिडंडची रक्कम स्वीकारावी. तीन वर्षावरील न घेतलेल्या डिव्हिडंडची रक्कम सहकारी कायद्याप्रमाणे रिझर्व्ह फंडात वर्ग करावी लागते.

३) सभासदांच्या जुन्या पत्त्यामध्ये बदल झालेला असल्यास नवीन पत्ता कळवावा. तसेच आपला मोबाईल नंबर संस्थेस कळवावा.

४) ज्या सभासदांनी ओळखपत्र देण्यासंबंधी अजूनही फोटो दिलेले नसतील अशा सभासदाने पोष्ट टिकिटसाईज आपले दोन फोटो कार्यालयात देऊन आपले ओळखपत्र लवकरांत लवकर घेऊन जावे.





५) ओळखपत्र दाखविल्याशिवाय सभासदांना सभागृहात प्रवेश दिला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

६) सभासदांनी वारस नोंद केली नसल्यास वारस नोंद करावी.

# नफा वाटणी

संस्थेस अहवाल वर्षी निव्वळ नफा रु. ४०,५९,२७५.६१ एवढा झालेला आहे. त्याची विभागणी पोटनियमानुसार करण्यांत आलेली आहे. बाकी उरलेल्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे व्यवस्थापक मंडळाने सुचविली असून आपण त्यास मान्यता द्यावी ही विनंती.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | रिझर्व्ह फंड | २५% | रु. | १०,१४,८१९.०० |
| २. | स्पेशल इम. रिझर्व्ह फंड | १०% | रु. | ४,०५,९२८.०० |
| ३. | इमारत फंड | ५% | रु. | २,०२,९६४.०० |
| ४. | बुडीत फंड | ५% | रु. | २,०२,९६४.०० |
| ५. | सभासद डिव्हीडंड १५% प्रमाणे | | रु. | ७०,८१५.०० |
| ६. | सभासद कल्याण निधी | ६% | रु. | २,४३,५५७.०० |
| ७. | कामगारवृंद कल्याण निधी | ३% | रु. | १,२१,७७८.०० |
| ८. | मानधन | | रु. | १४,४००.०० |
| ९. | धर्मदाय फंड | | रु. | २,००,०००.०० |
| १०. | कृषि विकास फंड | | रु. | २,००,०००.०० |
| ११. | इमारत फंड | | रु. | १२,००,०००.०० |
| १२. | आकस्मित फंड | | रु. | १,८२,०५०.६१ |
| | | | एकूण रुपये | ४०,५९,२७५.६१ |

## क्रियाशील सभासद :

क्रियाशील सभासद म्हणजे संस्थेचा असा सभासद जो संस्थेच्या सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सर्व सभासदांच्या अधिमंडळाच्या किमान एका सभेला उपस्थित आहे आणि खालील बाबींपैकी एका बाबीची पूर्तता केली आहे असा भागधारक सभासद.

१) सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये किमान एक वेळा अल्प मुदत कर्ज (रोख रकमेच्या स्वरूपात अथवा अन्य प्रकारे) अथवा मध्यम मुदत कर्ज घेतले अथवा दिर्घ मुदत कर्ज घेतले असले पाहिजे.

२) सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये कमीत कमी रु. १,०००/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) ठेव सलग कमीत कमी एक वर्षाच्या कालावधीकरीता ठेवली असली पाहिजे.

३) सलग पाच वर्षाच्या कालावधीमध्ये संस्था पुरवित असलेल्या उपरोक्त सेवाखेरीज इतर सेवांचा किमान एकदा उपभोग घेतला असला पाहिजे.

## दि. १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यंत

| २०२१-२०२२ रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | २०२२-२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १,८८,००,२३२.०० | आरंभी शिल्लक माल | | १,७७,४०,७९५.०० |
| | माल खरेदी | | |
| १०,९०,३९,३५२.०० | सामान्य माल | १८,७३,०३,२०५.०० | |
| ३,८८,३३,२०७.०० | किराणा माल | ३,५७,३०,२१५.०० | |
| ४२,१२,३४,९६७.०० | भारत गॅस माल | ४९,७८,८४,३८०.०० | |
| ८६,३३,४८२.०० | मिश्रण खत माल | ९४,५१,८७३.०० | |
| | | | ७३,०३,६९,६७३.०० |
| | खर्च | | |
| १०,७८,५३७.०० | सामान्य माल | १२,५९,५८५.०६ | |
| ७,०७,१००.०० | किराणा माल | ९,५०,८९१.०० | |
| १,२०,२०,४५३.८८ | भारत गॅस माल | १,३६,८५,८८३.०० | |
| ३,५७,०१४.४० | मिश्रण खत माल | ६,१५,८३१.५० | |
| ५,०००.०० | प्रोफेशनल टॅक्स | ---- | |
| | | | १,६५,१२,१९१.०६ |
| ३९,४१,४६३.४१ | वाहतूक खाते | | ३७,९७,१३५.१५ |
| | वेतन | | |
| ३१,९७,०६०.०० | सामान्य माल | ३३,३३,७८२.०० | |
| २३,२७,३६७.०० | किराणा माल | २६,७८,८९७.०० | |
| ५९,९४,१५३.०० | भारत गॅस माल | ६५,३८,८०९.०० | |
| ८,१०,५१२.०० | मिश्रण खत माल | ९,८०,४८४.०० | |
| १४,६६,१८९.०० | वाहतूक खाते | १४,८२,८०७.०० | |
| | | | १,५०,१४,७७९.०० |
| ७,५०,७९२.५० | रिफंड / डेबीट नोट | | १४,७६,६५९.०० |
| १,८०,४१,२९९.२९ | व्यापारी नफा | | १,७५,६७,९६८.८२ |
| ६४,७२,३८,१८१.४८ | एकूण | | ८०,२४,७९,२०१.०३ |





## व्यापारी पत्रक

| २०२१-२०२२ रुपये पैसे | जमा | रुपये पैसे | २०२२-२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | माल विक्री | | |
| ११,६२,६७,१५२.९६ | सामान्य माल | १९,५०,६५,५७१.२५ | |
| ४,१९,६८,९०२.५० | किराणा माल | ३,९२,७५,४०२.०० | |
| ४५,७३,६२,७०७.४८ | भारत गॅस माल | ५३,२७,९६,७१३.७१ | |
| ९०,८९,९५३.८९ | मिश्रण खत माल | १,०३,३८,५५२.५६ | |
| | | | ७७,७४,७६,२३९.५२ |
| | बारदान विक्री | | |
| ११,०५२.०० | किराणा माल | ४,४०८.०० | |
| २०,३७१.०० | मिश्रण खत माल | ५,४२७.०० | |
| | | | ९,८३५.०० |
| | रिकामी डबे विक्री | | |
| ६१९.०० | किराणा माल | ---- | ---- |
| २५,५२,३६३.५६ | वाहतूक खाते | | ३५,९५,३४४.५० |
| २२,२४,२६४.०९ | रिफंड / क्रेडीट नोट | | ३५,६०,२१३.०१ |
| १,७७,४०,७९५.०० | अखेर शिल्लक माल (३१-३-२०२३) | | १,७८,३७,५६९.०० |
| ६४,७२,३८,१८१.४८ | एकूण | | ८०,२४,७९,२०१.०३ |

## दि. १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यंत

| २०२१-२०२२ रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | २०२२-२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **व्याज खाते** | | |
| १,२८,१३०.०० | ठेवींवरील | १,८०,२७२.०० | |
| १,१०२.०० | बचत खात्यावरील | १,५१३.०० | |
| ४३,४५४.०० | व्याज (बँक अकौंटवरील) | १,२२,४४१.०० | |
| | | | ३,०४,२२६.०० |
| | **खर्च** | | |
| १७,६५,४९१.५५ | कार्यालयीन | १४,७८,३०६.३१ | |
| २३,९३,०२०.०० | वेतन - कार्यालयीन | २४,१०,५६९.०० | |
| ४,६५,७५६.०० | कामगार प्रॉ. फंड - सोसायटी वर्गणी | ४,२३,१३२.०० | |
| १०,९०,४४०.०० | फॅमिली पेन्शन - सोसायटी वर्गणी | १०,००,७२३.०० | |
| ४,२१,०५४.०० | इ. एस्. आय. सी. - सोसायटी वर्गणी | १,८८,५४२.०० | |
| ६६,९०३.०० | प्रॉ. फंड ॲडमिनीस्ट्रेटीव्ह फी | ५५,२७०.०० | |
| ७०,२१०.०० | लिंक इन्शुरन्स ॲडमिनीस्ट्रेटीव्ह फी | ५५,२७०.०० | |
| ९,७४,२४४.०० | कामगारवृंद घरभाडे | ८,७०,८७४.०० | |
| ७,६५,३९६.०० | कामगारवृंद बोनस | ७,२०,३०५.०० | |
| | | | ७२,०२,९९१.३१ |
| | **कर व शुल्क** | | |
| ३७,९९,५४६.०० | आयकर | २८,८८,९८२.८५ | |
| १,११,५७१.०० | घरपट्टी | १,१७,०९९.०० | |
| ---- | वॅट टॅक्स | १०,६९,४४७.७३ | |
| १२,६१०.०० | जमिनधारा खर्च | १२,६१०.०० | |
| ५,१८,८०३.०० | ऑडीट फी | ६,८९,६४९.०० | |
| १,३५,५५६.०० | TCS चार्ज | १५,६८७.०० | |
| | | | ४७९३४७५.५८ |

(पान नं. १२ वर)





## नफा तोटा पत्रक

| २०२१-२०२२ रुपये पैसे | जमा | रुपये पैसे | २०२२-२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **व्याज खाते** | | |
| ६२,७१,३६५.८२ | गुंतवणूकीवरील | ५४,२८,३१८.८८ | |
| ६१,७४२.०० | कर्ज रकमेवरील | ३७,४९२.०० | |
| १,३६०.०० | बँक अकौंट वरील | १,०७०.०० | |
| | | | ५४,६६,८८०.८८ |
| | **भाडे जमा** | | |
| ४४,५००.०० | सभागृह | ८,३६,९००.०० | |
| ४,९२,०००.०० | शॉप रेंट | ५,६४,५८८.०० | |
| | | | १४,०१,४८८.०० |
| | **इतर जमा** | | |
| ४६,७८८.०० | प्रशासकीय फी | ५२,८००.०० | |
| १,३९०.०० | शेअर ट्रान्सफर फी | १,१४०.०० | |
| १९०.०० | वारस बदल फी | ४८०.०० | |
| ३३,६००.०० | मॅन्डेटरी इन्स्पेक्शन फी | १,४६,०००.०० | |
| २,८७,६००.०० | सर्व्हिस चार्ज व इन्स्टॉलेशन फी | १,९८,२००.०० | |
| | | | ३,९८,६२०.०० |

(पान नं. १३ वर)

## दि. १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यंत

| २०२१-२०२२ रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | २०२२-२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | (पान नं. १० वरुन) | | |
| | इतर खर्च | | |
| ९,३८,९१९.१४ | झीज | ९,८१,७९६.७५ | |
| ५,३१,९८६.०० | विमा हप्ता | ६,४७,८६५.०० | |
| १,२०,११४.०० | टेलिफोन बिल | १,२७,७९८.०० | |
| २३,२८,२३८.५० | बिल्डींग दुरुस्ती | १९,१३,७८३.०० | |
| ५,०४,२६०.०० | विद्युत बिल | ५,८७,७१०.०० | |
| ९१,७९५.०० | सभागृह खर्च | १,२२,६५४.०० | |
| २५,२७३.७८ | बँक चार्जेस | १,७१,२९५.४५ | |
| १,५७,८४१.०० | वार्षिक सभा खर्च | १,९२,३७०.५० | |
| ४०,२५१.५० | सुट | ४९,१४०.५० | |
| ८५,४६६.५० | का. मं. मा. मिटींग खर्च | १,०१,८८१.०० | |
| १,१७,१८६.०० | प्रवास खर्च | १,२०,५२९.०० | |
| १,१९,४६३.०० | जनरेटर खर्च | १,८३,६९९.०० | |
| ५४,७२८.०० | संगणक खर्च | ५१,५६०.०० | |
| ४५,०००.०० | भत्ता | ४५,०००.०० | |
| ४,००,०००.०० | खर्च तरतूद | २६,००,०००.०० | |
| २२,५७,७१०.०० | वेतन फरक | १,६५,८३७.०० | |
| | | | ८०,६२,९१९.२० |
| ९,५१,८८८.७९ | बुडीत खाती खर्च | | ---- |
| ३,१६,३१२.०० | प्रिंटींग स्टेशनरी | | ४,१२,०७०.०० |
| ३४,३२,११५.३५ | निव्वळ नफा | | ४०,५९,२७५.६१ |
| २,५२८१८३५.११ | एकूण | | २,४८,३४,९५७.७० |





## नफा तोटा पत्रक

| २०२१-२०२२ रुपये पैसे | जमा | रुपये पैसे | २०२२-२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | (पान नं. ११ वरुन) | | |
| १,८०,४१,२९९.२९ | व्यापारी नफा | | १,७५,६७,९६८.८२ |
| २,५२८१८३५.११ | एकूण | | २,४८,३४,९५७.७० |

## दि. ३१ मार्च २०२३

| २०२१-२०२२ रुपये पैसे | भांडवल व देणे | रुपये पैसे | २०२२-२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ९,९०,०००.०० | अधिकृत भाग भांडवल | | ९,९०,०००.०० |
| | वसूल भाग भांडवल | | |
| ४,७२,१००.०० | सभासद | | ४,७२,१००.०० |
| | फंड | | |
| २,५१,५६,३३६.१२ | रिझर्व्ह फंड | २,६०,२१,५८८.१२ | |
| ९९,४५,९४१.४३ | स्पेशल इम. रिझर्व्ह फंड | १,०२,८९,१५३.४३ | |
| ३,२५,५०२.०८ | डिव्ही. इक्वी. फंड | ३,२५,५०२.०८ | |
| १,२३,३६,१११.९० | बिल्डिंग फंड | १,२५,०७,७१७.९० | |
| ४,१६,८६,०००.०० | बिल्डिंग फंड -भारत गॅस गोडावून | ४,२६,८६,०००.०० | |
| ६७,९०,९७३.८७ | बुडीत फंड | ६९,६२,५७९.८७ | |
| ५,१६,६६०.०० | बिल्डिंग रिझर्व्ह फंड | ५,१६,६६०.०० | ९,९३,०९,२०१.४० |
| | इतर फंड | | |
| २०,८७,०२९.४२ | धर्मदाय फंड | २०,२२,०२९.४२ | |
| २०,४९,३३५.३५ | नोकर ग्रॅच्युईटी फंड | १६,६८,४२०.३५ | |
| ४४,२४,८८१.४६ | कृषी विकास फंड | ४६,२४,८८१.४६ | |
| ८७,०८,५००.७८ | आकस्मित तरतूद | ९५,१७,३०६.६३ | |
| २२,८१,१३५.०० | कामगार कल्याण निधी | २३,४५,४९८.०० | |
| ४१,२९,८०९.०० | सभासद कल्याण निधी | ३८,८५,०३६.०० | |
| २५,०००.०० | निवडणूक निधी | २५,०००.०० | २,४०,८८,१७१.८६ |
| | ठेवी | | |
| २२,५४,९११.०० | मुदत ठेव | २५,६१,७०७.०० | |
| ३७,८३४.०० | सेव्हिंग ठेव | ३९,३४७.०० | २६,०१,०५४.०० |
| | देणी | | |
| १७,९४०.०० | डिव्हिडंड सभासद | २०,८१०.०० | |
| ११,८८,१४६.४० | अनामत | १२,०६,९८३.५० | |
| १६,४७,०८८.५७ | व्यापारी देणे | १५,५३,२६२.८७ | |
| ४४,६६,४३९.९१ | ॲडव्हान्स | ३२,२३,४००.८२ | |
| १,३५,०५०.०० | सभागृह ॲडव्हान्स | ४,६४,९५२.०० | |
| १,९९,८८३.०० | कामगार देणे | २,६७,५७०.७५ | |

(पान नं. १६ वर)





## अखेर ताळेबंद

| २०२१-२०२२ रुपये पैसे | जिदंगी व येणे | रुपये पैसे | २०२२-२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | शिल्लक कॅश | | |
| ७,८९२.३४ | हाती शिल्लक | १९,८०५.३० | |
| ४,०९,०६८.३३ | करंट अकाऊंट बँक ऑफ इंडिया १०१० | १,२४,०४४.०४ | |
| १९,३८,७३१.०१ | करंट अकाऊंट बॅसीन कॅथॉ. बँक ६८१ | २१,८१,४३४.०९ | |
| १,०३,१६५.०७ | करंट अकाऊंट ठाणे बँक ०३५/१२ | १,४८,९५५.२७ | |
| ९,४२२.२६ | सेव्हिंग अकाऊंट ठाणे बँक ०३१/१३ | ९,४२२.२६ | |
| ३८,०१३.०० | सेव्हिंग अकाऊंट बँक ऑफ इंडिया ६७२४ | ३९,०८३.०० | |
| ५,७५,९७१.८१ | वसई विकास सह. बँक लि. २२०६ | १९,३३,८०४.२६ | |
| ३०,५७९.५० | करंट अकाऊंट आय.सी.आय.सी.आय. | १,३५,४८७.३० | ४५,९२,०३५.५२ |
| | गुंतवणूक जनरल | | |
| १,३४,४१०.०० | शेअर्स - सहकारी संस्था | १,३४,४१०.०० | |
| ७,९३,९४५.०६ | बँक ऑफ इंडिया, बंगली शाखा | ८,३७,९०९.०० | |
| २,५८,९७,७३५.०० | वसई विकास सह. बँक लि. | २,९६,६८,९७७.०० | |
| २,५९,४१,००१.०० | ठाणे जिल्हा मध्य.सह. बँक वसई | २,६६,९२,६०१.०० | |
| २,००,७०,६४०.०० | बॅसीन कॅथॉ. बँक | १,७८,५९,४६८.०० | |
| ९४,८२९.०० | सहकार भूषण पुरस्कार ठेव - (ठाणे जिल्हा मध्य.बँक) | ९४,८२९.०० | |
| २२,४६,२२०.०० | स्पे. इम. रिझर्व्ह फंड - ठाणे जिल्हा बँक | ३३,३२,४४२.०० | |
| २०,००,०००.०० | ठाणे जिल्हा मध्य.सह. बँक वसई टर्म डि. | २०,००,०००.०० | ८,०६,२०,६३६.०० |
| १,३१,१६,११२.०० | गुंतवणूक कामगारवृंद ग्रॅच्यूएटी फंड | | १२५०१२२१.०० |
| १,३२,८३५.०० | सभासद कर्ज | | ११८५००.०० |
| | येणी | | |
| १८,३६,०२१.९६ | डिपॉझिट | २१,११,०२१.९६ | |
| १४,६८,०८२.०० | सिमेंट ॲडव्हान्स | १०,७५,२३२.०० | |
| ९,३३,६५०.५० | ऑईल ॲडव्हान्स खाते | १०,५०,५४३.०० | |
| ५२,८००.०० | भारत गॅस स्टॅम्प ड्यूटी | ३३,९००.०० | |
| २,४६,९२०.०० | कामगारवृंद कर्ज | २,१७,८०३.०० | |

(पान नं. १७ वर)

## दि. ३१ मार्च २०२३

| २०२१-२०२२ रुपये पैसे | भांडवल व देणे | रुपये पैसे | २०२२-२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | (पान नं. १४ वरुन) | | |
| १,६२,४०८.२१ | ऑईल ॲडव्हान्स | १,४९,०३८.४१ | |
| ३५,७४९.०० | सिमेंट ॲडव्हान्स | ---- | |
| ५,०८१.००० | एफ.टी.एल.खाते | ---- | |
| ७४,८०८.०० | भारत गॅस ॲडव्हान्स | ९९,७४८.५० | |
| | | | ६९,८५,७६६.८५ |
| | **इतर देणी** | | |
| २,५३,९६१.४० | तरतूद | ३,९९,९७७.४० | |
| २,६७,३७२.०० | व्याज देणे | २,४९,८१३.०० | |
| १७,७३२.०० | टी. डी. एस. प्रोफेशनल फी | ४,२३२.०० | |
| १३,८२५.०० | कामगारवृंद प्रोफेशनल टॅक्स | १३,०००.०० | |
| | नोकरवृंद प्रॉव्हिडंड फंड | १,५५,३७५.०० | |
| | कामगारवृंद पेन्शन फंड | ८२,६४५.०० | |
| | नोकरवृंद इ.एस.आय.सी. फंड | १९,३५०.०० | |
| ६४,५१७.०० | वेतन ॲडव्हान्स | ११,०००.०० | |
| २१,५२२.०० | टी. डी. एस. कॉन्ट्रॅक्टर | ३०,५०५.५० | |
| ३,९८,५६१.४४ | जी. एस. टी. पेबल | १,३८,३४३.७० | |
| ४,१८८.०० | कामगार कल्याण निधी | ५,८०८.०० | ११,१०,०४९.६० |
| ७७,७२५.५० | **येणी नफातोटा खाती वर्ग** | | ७७,७२५.५० |
| ३४,३२,११५.३५ | **निव्वळ नफा** | | ४०,५९,२७५.६१ |
| १३,५७,१२,१८३.१९ | **एकूण** | | १३,८७,०३,३४४८२ |

ह्याच तारखेच्या आमच्या तपासणी अहवालातील शेऱ्यांस पात्र राहून

**मे. मनिष शिंदे अँड असोसिएट, चार्टर्ड अकौंटंटस् करिता**

**( श्री. मनिष शिंदे )**

मालक





## अखेर ताळेबंद

| २०२१-२०२२ रुपये पैसे | जिदंगी व येणे | रुपये पैसे | २०२२-२०२३ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | (पान नं. १५ वरुन) | | |
| ६१,४२,७४१.०० | व्याज येणे | ६५,७३,७५९.९७ | |
| ९३,५४२.९० | भारत गॅस एस. व्ही. टी. व्ही. डिपॉझिट | १,००,९९४.८४ | |
| ६,०६,४३५.७३ | वॅट टॅक्स | ---- | |
| ८,०८,५८५.०० | भारत गॅस ॲडव्हान्स | १४,८६,६८५.७४ | |
| १,४८,१०३.५० | एफ. टी. एल. खाते | ९४,४५६.०० | |
| १,४९,१९९.०० | बिर्ला व्हाईट सिमेंट खाते | ४०,०००.०० | |
| १,६१,३३२.७० | टी.डी.एस. बँक येणे | ५,२०,९८६.९४ | |
| २१,७१,६१८.७४ | व्यापारी उधारी | ७,१३,७०७.०८ | |
| २८,३१७.५० | अनामत | २९,३७८.६० | |
| १५,६९,६२१.५१ | ॲडव्हान्स | ६,००,६११.५७ | |
| ---- | टी. डी. एस. कंपनी येणे | १,६७,७९५.२४ | |
| ५३,३६६.७६ | कामगार येणे | २०,२२१.०० | १,४८,३७,०१६.१४ |
| ३८,५३,४७७.०० | **स्थावर मालमत्ता** | | ३७,३८,९०४.०० |
| | इमारती (देवतळे ४, दुकाने ५, गोदाम ३) | | |
| | जमीन (देवतळे, वाघोली) | | |
| २०,५४,२४८.०० | **वाहने** | | २५,१६,८९५.०० |
| | (३ ट्रक, ३ टेंपो, ३ जीप, २ दुचाकी व १ स्कार्पिओ) | | |
| ५७,४५४.०० | **मशिनरी** | | ३५,६०८.०० |
| | (संगणक २३, प्रिंटर १४, यूपीएस १२, जनरेटर २) | | |
| १४,३१,६२८.०० | **डेडस्टॉक** | | १३,३९,७९०.०० |
| ४,१३२.५१ | **लायब्ररी** | | ३,७१९.२६ |
| ४,८१,७३४.०० | विमा दावा येणे | | ४,८१,७३४.०० |
| ---- | ओव्हरड्राफ्ट १०५ वसई विकास | | १,११०.६० |
| ७७,७२५.५० | **देणी नफातोटा खाती वर्ग** | | ७७,७२५.५० |
| १,७७,४०,७९५.०० | **शिल्लक माल** | | १,७८,३७,५६९.०० |
| १३,५७,१२,१८३.१९ | **एकूण** | | १३,८७,०३,३४४८२ |

वरील ताळेबंद सोसायटीची सद्य परिस्थिती बरोबर दर्शवित आहे.

| **गौतम द. वर्तक** | **हरेश्वर ना. राऊत** | **समीर ज. पाटील** | **आशय ह. राऊत** |
|---|---|---|---|
| व्यवस्थापक | मा. सचिव | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

## वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि; देवतले-वसई.

### सन २०२३-२४ सालचे खर्चाचे अंदाज पत्रक



| क्र. | खर्चाचा तपशील | सन २०२२-२३ चा अंदाज | सन २०२२-२३ चा प्रत्यक्ष खर्च | वाढ ( + ) | घट ( - ) | सन २०२३-२४ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | किरकोळ खर्च | १५,००,०००.०० | १४,७८,३०६.०० | | २१,६९४.०० | १५,००,०००.०० |
| २ | सेवक वर्ग खर्च | ८०,००,०००.०० | ५९,३५,५२२.०० | | २०,६४,४७८.०० | ६५,००,०००.०० |
| ३ | सभा खर्च | ३,००,०००.०० | २,९४,२९१.०० | | ५,७०९.०० | ३,००,०००.०० |
| ४ | प्रवास खर्च | १,५०,०००.०० | १,२०,५२९.०० | | २९,४७१.०० | १,५०,०००.०० |
| ५ | विमा खर्च | ६,००,०००.०० | ६,४७,८६५.०० | ४७,८६५.०० | | ७,००,०००.०० |
| ६ | टेलिफोन खर्च | १,२०,०००.०० | १,२७,७९८.०० | ७,७९८.०० | | १,५०,०००.०० |
| ७ | वीज व जनरेटर खर्च | ६,५०,०००.०० | ७,७१,४०९.०० | १,२१,४०९.०० | | ८,००,०००.०० |
| ८ | सभासद व ग्राहक सूट | १,००,०००.०० | ४९,१४०.०० | | ५०,८६०.०० | १,००,०००.०० |
| ९ | बँक चार्जेस | १,००,०००.०० | १,७१,२९५.०० | ७१,२९५.०० | | २,००,०००.०० |
| १० | तरतुदी | २०,००,०००.०० | २६,००,०००.०० | ६,००,०००.०० | | २२,००,०००.०० |
| ११ | व्याज देणे | १,८०,०००.०० | ३,०४,२२६.०० | १,२४,२२६.०० | | ३,५०,०००.०० |
| १२ | प्रिंटींग व स्टेशनरी | ३,५०,०००.०० | ४,१२,०७०.०० | ६२,०७०.०० | | ४,५०,०००.०० |
| १३ | घरपट्टी व जमीनधारा | २,००,०००.०० | १,२९,७०९.०० | | ७०,२९१.०० | २,००,०००.०० |
| १४ | आयकर | ३०,००,०००.०० | २८,८८,९८३.०० | | १,११,०१७.०० | २५,००,०००.०० |
| १५ | लेखापरीक्षण शुल्क | ५,५०,०००.०० | ६,८९,६४९.०० | १,३९,६४९.०० | | ७,००,०००.०० |
| १६ | इमारत दुरुस्ती | ४०,००,०००.०० | १९,१३,७८३.०० | | २०,८६,२१७.०० | २०,००,०००.०० |
| १७ | घसारा | १०,००,०००.०० | ९,८१,७९७.०० | | १८,२०३.०० | १५,००,०००.०० |
| १८ | संगणक खर्च | २,००,०००.०० | ५१,५६०.०० | | १,४८,४४०.०० | २,००,०००.०० |
| १९ | सभागृह व इतर खर्च | १०,००,०००.०० | १,३८,३४१.०० | | ८,६१,६५९.०० | ५,००,०००.०० |
| २० | नफा | ८०,००,०००.०० | ४०,५९,२७६.०० | | ३९,४०,७२४.०० | ५०,००,०००.०० |
| | एकूण | ३,२०,००,०००.०० | २,३७,६५,५४९.०० | ११,७४,३१२.०० | ९४,०८,७६३.०० | २,६०,००,०००.०० |

## वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि; देवतले-वसई.

### सन २०२३-२४ सालचे उत्पन्नाचे अंदाज पत्रक



| क्र. | उत्पन्नाचा तपशील | सन २०२२-२३ चा अंदाज | सन २०२२-२३ चा प्रत्यक्ष उत्पन्न | वाढ ( + ) | घट ( - ) | सन २०२३-२४ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यापारी नफा | २,३०,००,०००.०० | १,७५,६७,९६९.०० | ---- | ५४,३२,०३१.०० | १,९०,००,०००.०० |
| २ | व्याज जमा | ७०,००,०००.०० | ५४,६६,८८१.०० | ---- | १५,३३,११९.०० | ५०,००,०००.०० |
| ३ | इतर उत्पन्न | १०,००,०००.०० | ३,९८,६२०.०० | ---- | ६,०१,३८०.०० | ५,००,०००.०० |
| ४ | सभागृह भाडे | १०,००,०००.०० | १४,०१,४८८.०० | ४,०१,४८८.०० | | १५,००,०००.०० |
| | एकूण | ३,२०,००,०००.०० | २,४८,३४,९५८.०० | ४,०१,४८८.०० | ७५,६६,५३०.०० | २,६०,००,०००.०० |

## ∻ आम्ही आपले आभारी आहोत ∻

- मा. खासदार श्री. राजेंद्र गावित, लोकसभा सदस्य, भारत सरकार.
- मा. आमदार श्री. हितेंद्र ठाकूर व श्री. क्षितिज ठाकूर, विधान सभा सदस्य, महाराष्ट्र राज्य.
- जिल्हा उपनिबंधक श्री. शिरीष कुलकर्णी साहेब व त्यांचे सहकारी.
- वसई तालुक्याचे उपनिबंधक श्री. अमर शिंदे व त्यांचे कार्यालयीन अधिकारी.
- वसई तालुक्याचे तहसिलदार श्री. अविनाश कोष्टी व त्यांचे कार्यालयीन अधिकारी.
- वसई तालुक्याचे प्रांत अधिकारी श्री. शेखर घाडगे साहेब व त्यांचे कार्यालयीन अधिकारी.
- वसई-विरार शहर महानगरपालिका आयुक्त श्री. अनिलकुमार पवार साहेब व त्यांचे कार्यालयीन अधिकारी.
- वसई-विरार शहर महानगरपालिका माजी महापौर श्री. प्रविण शेट्टी साहेब.
- ठाणे जिल्हा मध्य. सहकारी बँकेचे पदाधिकारी, कर्मचारी वर्ग व वसई शाखेचे शाखाधिकारी व त्यांचे सहकारी वर्ग.
- बँक ऑफ इंडिया, बंगली शाखेचे शाखाधिकारी व त्यांचे सहकारी वर्ग.
- बसीन कॅथॉ. बँकेचे चेअरमन व जनरल मॅनेजर, कर्मचारीवृंद व बंगली शाखेचे शाखाधिकारी व त्यांचे सहकारी.
- वसई विकास बँकेचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी वर्ग.
- पालघर जिल्ह्याचे कृषि अधिकारी व त्यांचे सहकारी.
- कृषि उत्पन्न बाजार समिती वसई यांचे चेअरमन व संचालक मंडळ.
- वसई तालुक्याचे गटविकास अधिकारी व त्यांचे सहकारी.
- वसई पंचायत समितीचे कृषी अधिकारी व त्यांचे सहकारी.
- वसई तालुका पुरवठा अधिकारी व त्यांचे सहकारी.
- शासकीय प्रमाणित लेखा परिक्षक श्री. संदिप जैन व त्यांचे सहकारी.
- भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. चे विभागीय व्यवस्थापक, उरण विभागाचे टेरिटरी मॅनेजर व आपल्या विभागाचे बीपीसीएल कंपनीचे अधिकारी कु. वरूण सिंग तसेच त्यांचे सहकारी.
- महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळाचे अधिकारी व विक्री व्यवस्थापक.
- राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर्स लिमिटेडचे अधिकारी व विक्री व्यवस्थापक.
- ए.सी.सी. कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- हैद्राबाद कंपनीचे मार्केटिंग अधिकारी व त्यांचे सहकारी.
- जैन पाईप कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- JSW CEMENT & JSW STEEL कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- अल्ट्राटेक सिमेंट कंपनीचे युनिट, बिर्ला व्हाईट सिमेंट कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- सिन्टेक्स कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- TATA STEEL कंपनीचे अधिकारी व त्यांचे सहकारी.
- संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सर्व सेवाभावी संस्था व त्यांचे पदाधिकारी.
- संस्थेचे सन्माननीय सभासद, ग्राहक, ठेवीदार व हितचिंतक यांनी आस्थेने संस्थेवर नितांत प्रेम व विश्वास दाखवून संस्थेला उत्कर्षाच्या भक्कम पायावर उभे केल्याबद्दल.
- संस्थेचा कर्मचारीवृंद.

आपणा सर्वाकडून लाभत असलेले सहकार्य उत्तरोत्तर वाढत जावो हीच सदिच्छा व्यक्त करुन हा अहवाल पूर्ण करीत आहे.

**!! जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**

देवतळे, वसई.
दि. : १८-७-२०२३

**आशय हरेश्वर राऊत**
चेअरमन





## ∻ अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल ∻

आम्ही, वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि., देवतळे - वसई, जि. पालघर, या संस्थेचे दिनांक ३१ मार्च २०२३ रोजीचे ताळेबंद पत्रक व त्या दिवशी पूर्ण होणाऱ्या सहकार वर्षाचे व्यापारी पत्रक व नफा-तोटा पत्रक अंतर्गत लेखा परिक्षक म्हणून पाहिले असून, त्याबाबत अहवाल देतो की,

१) आमच्या हिशोब तपासणीच्या उद्देशासाठी आमच्या पूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थेच्या १९६० चा कायदा व त्या खालील नियम व संस्थेचे पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) आम्ही तपासलेले ताळेबंद पत्रक, व्यापारी पत्रक व नफा तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकाशी व विवरणाशी जुळत आहेत.

४) आमच्या मते आणि आमच्या माहितीप्रमाणे तसेच आम्हाला देण्यांत आलेल्या खुलाशावरुन व आम्ही जोडलेल्या शेरे पत्रकातील शेरे लक्षात घेता हे हिशोब महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थेच्या १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक ती सर्व माहिती देतात आणि

अ) ताळेबंद पत्रक संस्थेची ३१ मार्च २०२३ अखेर खरी व योग्य परिस्थिती दाखविते व

ब) नफा - तोटा पत्रक संस्थेच्या दिनांक ३१ मार्च २०२३ अखेर होणाऱ्या सहकार वर्षाचा खरा व योग्य नफा दाखवितो.

देवतळे - वसई.
दिनांक : १६-०६-२०२३

**मे. मनिष शिंदे अँड असोसिएटस्**
चार्टर्ड अकौंटंटस् करिता
**( सीए. मनिष शिंदे )**
(मालक)
अंतर्गत लेखा परिक्षक.

# ∴ वैधानिक लेखा परिक्षक अहवाल ∴

नमुना 'एन-२'

(कलम ८१ आणि नियम ६९(३) पाहा)

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.
देवतळे, ता. वसई, जि. पालघर

**विषय :** नेमणूकपत्र संदर्भ क्र. वशेविकासमो/०७६/मास दि. ३०-०९-२०२२
प्रमाणिक लेखापरिक्षक म्हणून आर्थिक विवरणाचा अहवाल.

१) वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या., वसई यांचे आर्थिक विवरणाचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे. त्यामध्ये ताळेबंद पत्रक ३१ मार्च २०२३ पर्यंतचे असून वर्षाच्या अखेरीपर्यंतचे नफा आणि तोटा विवरणपत्रक आणि हिशेबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेली असून, संस्थेचे लेखापरिक्षण आम्ही १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यंतचे केले आहे.

**व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राची जबाबदारी**

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम या अन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अंमलात आणणे आणि आर्थिक विवरणपत्र तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण संबंधात महत्वाच्या चुकीच्या विवरणपत्रामध्ये मुक्त राहील मग ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल.

**लेखापरिक्षकाची जबाबदारी**

३) केलेल्या लेखापरिक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंन्स ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे लेखापरिक्षणाचे आम्ही संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नीतितत्वाच्या पालनाची जरूरी आहे व ती आम्ही पाळली आहे आणि लेखापरिक्षण योग्य आश्वासनपूर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्वाच्या चुकीच्या विवरणपत्रापासून मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

४) लेखापरिक्षेमध्ये लेखापरिक्षण जे उघड न केलेले आणि रक्कम आतील पुरावा जमा करणे ही याची पद्धत आहे व ते लेखापरिक्षकांच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पद्धत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पद्धत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षेमध्ये जमाखर्चाच्या मुल्यांकनाच्या विनियोजनाचा वापर आणि जमाखर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

५) लेखापरिक्षेचा पुरावा जो आम्ही मिळविला आहे तो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.



वसई शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि; देवतळे-वसई. ८४ वा वार्षिक अहवाल

**अभिप्राय**

६) आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पूर्ण माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकांनी प्रसिद्ध केलेली संस्थेला जरूरीची असणारी परिपत्रके आणि योग्य ते उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्वसाधारण भारतात मान्य केला आहे

१) ताळेबंद पत्रकाच्या संबंधात संस्थेच्या बाबतीत ३१ मार्च २०२३

२) नफा आणि तोटा विवरणपत्राच्या बाबतीत / जमा आणि खर्च त्या वर्षीच्या शेवटच्या दिवशी आणि

**इतर कायदेशीर आणि नियामक बाबीवरील अहवाल**

७) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा विवरणपत्र तयार केलेले आहे.

**आम्ही अहवाल देतो की,**

८) अ) आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, जे आमच्या लेखापरिक्षणासाठी जरूर आहे ते मिळालेल्या पुऱ्या माहितीनुसार आम्हांस असे आढळून आले आही की, ते समाधानकारक आहे.

ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारात करण्यात आले आहेत.

क) आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

९) लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा हिशेब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

१०) **आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो :**

१) या अहवालासंदर्भात ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा आणि खर्चाचा हिशेब हे हिशेबाची पुस्तके आणि विवरण पत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.

२) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यावर संस्थेने योग्य ती ताळेबंद पत्रके जी अधिनियमानुसार जरूरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.

३) आम्ही लेखापरिक्षण केलेल्या शाखांचे ताळेबंद पत्रक शाखा लेखापरिक्षकांनी केले असून, तो आम्हांला जरुरीचा आहे त्याप्रमाणे दिलेला आहे.

४) लेखापरिक्षण चालू असणाऱ्या वर्षी संस्थेला 'अ' वर्ग मिळाला आहे.

देवतळे - वसई.
दिनांक : २७-०६-२०२३

**एस. बी. जैन अँड असोसिएट**
चार्टर्ड अकौंटंट

**सीए संदिप भगवतीलाल जैन**
शासकीय प्रमाणित लेखापरिक्षक सहकारी संस्था

## मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिसुचनेच्या अनुषंगाने पोटनियम दुरूस्ती

| पोटनियम क्र. | सध्याच्या पोटनियम क्रमांकाची शब्दरचना | दुरूस्त पोटनियमाची शब्दरचना | दुरूस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| ४ | संस्थेचे उद्देश खालीलप्रमाणे असतील अ.क्र.१ ते १२, १३ (अ ते ई), १४, १४ (१अ, ब, क, ड), १४ (२, ३, ४), १४ (५ अ, ब, क), १५ ते ३० | संस्थेचे उद्देश खालीलप्रमाणे असतील अ.क्र.१ ते १२, १३ (अ ते ई), १४, १४ (१अ, ब, क, ड), १४ (२, ३, ४), १४ (५ अ, ब, क), १५ ते ३० <br> या व्यतिरिक्त मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाकडील जा. क्र. २९६ / २०२३ दिनांक २१ एप्रिल २०२३ च्या पत्रासोबत प्राप्त सुचीतील १५१ विविध व्यवसाय असे एकूण १८१ व इतर उद्देश व्यवसाय संस्थेस राबविता येतील. | मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाकडील जा. क्र. २९६/२०२३ दिनांक २१ एप्रिल २०२३ चे पत्रातील सूचना. |
| म.स.सं. ३५ मधील अधिसूचना | प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था, आपले भरणा झालेले भागभांडवल संचित राखीव निधी आणि इमारत निधी यातून संचित तोटयांच्या रकमा वजा जाता शिल्लक राहिलेल्या रकमेच्या एकूण १० पटीपेक्षा अधिक होईल इतक्या रकमेची जबाबदारी पत्करणार नाहीत. | प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था, आपले भरणा झालेले भागभांडवल संचित राखीव निधी आणि इमारत निधी यातून संचित तोटयांच्या रकमा वजा जाता शिल्लक राहिलेल्या रकमेच्या एकूण २५ पटीपेक्षा अधिक होईल इतक्या रकमेची जबाबदारी पत्करणार नाहीत. | मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाकडील जा. क्र. २९६/२०२३ दिनांक २१ एप्रिल २०२३ चे पत्रातील सूचना. |